# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १६३** **दिनांक १६/०६/२०२१**

## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने एस्कॉर्ट सर्व्हिसेसच्या माध्यमातुन चालणा-या वेश्या व्यवसायावर कारवाई करुन ०३ आरोपीना अटक करुन ०२ पिडित मुलीची केली सुटका.

मिरा भाईंदर परिसरातील एस्कॉर्ट सर्व्हिसेसच्या माध्यमातुन चालणा-या वेश्या व्यवसाबाबत गोपनीय माहिती घेत असतांना आशिष राणा हा ऑनलाईन जाहिरातीव्दारे तसेच त्याचे मोबाईल क्रमांकाव्दारे ग्राहकांना संपर्क करुन, तो वेश्या व्यवसायासाठी वसई व मिरा भाईंदर परिसरातील लॉजमध्ये रुम बुक करुन किंवा ग्राहकास लॉजमध्ये रुम बुक करावयास लावून किंवा ग्राहकाचे सोयीनुसार वेश्यागमनाकरीता मुली पुरवितो अशी खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार दि.१५.०६.२०२१ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.एस.एस.पाटील यांनी बोगस ग्राहक व पंच यांना आकृती बिल्डींग नं १३, मिरा रोड, पुर्व या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह छापा टाकला असता रिक्षा चालक चंद्रशेखर यादव, वय-४८ वर्षे, रा.मिथील हाईटस् बिल्डींगच्या बाजुला, गार्डन सिटी समोर, मिरा रोड पुर्व हा वेश्यागमनाचे मोबदल्यात पैसे स्विकारुन पुरुष ग्राहकाला मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने त्याला वेश्यागमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०१ पिडित महिलेची सुटका करण्यात आली.

तसेच प्राथमिक चौकशीमध्ये वेश्यादलाल सुरजकुमार उर्फ आशिष राणा व त्याचा साथीदार राजा यादव हे रिक्षा चालक चंद्रशेखर यादव याच्या रिक्षातुन ग्राहकांना मुली पुरवित असल्याचे निष्पन्न झाल्याने वेश्यादलाल सुरजकुमार उर्फ आशिष राणा व त्याचा साथीदार राजा यादव यांना तात्काळ तन्वीर हॉस्पीटल समोर, पिके रोड, रामदेव पार्क, मिरा रोड पुर्व येथुन ताब्यात घेवुन ०१ पिडीत मुलीची सुटका केली. सदरबाबत काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. ४४१/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०,३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री.डॉ.महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री.रामचंद्र देशमुख ,सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर विभागाचे व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, पो.हवा./२२६९ उमेश पाटील,२२९८/ निलंगे, पो.शि.३६६० केशव शिंदे, चालक. पो.ना./२६३८ गावडे, म.पो.शि.१०१८/ साळवी सध्या भाईंदर पोलीस ठाणे (नेम. मुख्यालय, ठाणे ग्रा.) यांनी केली आहे.

........oooooooo............